232

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दूरध्वनी : ०२२ ६९४०३३३३ ई.मेल :collector.mumbaisuburb@maharashtra.gov.in

**म.रा.मा.ह.आयोग संदर्भ** Speed Post

क्र.:सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-२६०, ३२३, ३२५, ३६५/२०२३
दिनांक : ११ /०७/२०२३ 1006

**प्रति,**
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

**विषय : मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई**
**Suo-Moto Case No.२१५३/१३/१६/२०२३**
"कांदळवन कत्तल करुन बांधकाम होत असलेबाबत..."

**संदर्भ :** १) निबंधक, मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडील समन्स दि.२८/०४/२०२३ रोजीची समन्स.
२) उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४३१/२०२३, दि.०२/०६/२०२३.
३) उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील पत्र क्र.उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४३१/२०२३, दि.०६/०६/२०२३ .
४) आपलेकडील पत्र क्र.एस-१०/२०२३/प्र.क्र.१४८/फ-३, दि.२३/०५/२०२३ व दि.१६/०६/२०२३.
५) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.मशा/कार्या-९/वने/मा.मंत्री संदर्भ/२०२३, दि.१९/०६/२०२३.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 94
दिनांक 0/08/2023
उप वनसंरक्षक

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपलेकडील संदर्भ क्र.४ चे पत्र व त्यासोबत मा.मंत्री, वने, सांस्कृतीक कार्ये, मत्स्यव्यवसाय यांचेकडील दि.२४/०४/२०२३ रोजीच्या पत्राची छायाप्रत व सहपत्रे या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्या अनुषंगाने सदर प्रकरणी पुढीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडील दि.२८/०४/२०२३ रोजीची समन्स या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर प्रकरणी दि.२४/०४/२०२३ रोजीच्या लोकमत (हॅलो मुंबई) या वर्तमान पत्रामध्ये मौजे चारकोप याठिकाणी खाडीजवळ कांदळवनाची कत्तल करुन बांधकाम होत असलेबाबत बामती प्रसिध्द झालेली आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग सुमोटो केस दाखल करुन घेऊन दि.२५/०४/२०२३ रोजी सुनावणी घेऊन सदर सुनावणी दरम्यान संबधित विभागाना नोटीस बजावणेकामी निर्देशित केलेले होते. तसेच सदर प्रकरणी दि.०७/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित केलेली होती.

त्या अनुषंगाने सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे उक्त प्रकरणी आयोजित सुनावणीस या कार्यालयाच्यावतीने वेळोवळी उपस्थित राहणेकामी तसेच आयोगास आवश्यक ती माहिती सादर करणेकामी **उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना प्राधिकृत करणेत आलेले आहे.**

सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र.२ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार, मौजे चारकोप, ता.बोरीवली येथील स.क्र.४१ व ४२, न.भू.क्र.२ व ३/अ/१ ही जमीन (सी.आर.झेड.) ने बाधित आहे किंवा कसे? याबाबत उल्लेख केल्याचे दिसुन येत नाही. तसेच जागेवर भरणी करुन १० X १० चौ.फुटांचे एकूण ६ रुमचे नव्याने पक्क्या स्वरुपाचे बांधकाम चालू असल्याचे नमूद केले आहे. स.नं.४१/ड हा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे नावे तर स.नं.४२ हा कैकसरु रतनशा कालापीशी यांचे नावे असून सदरची जागा खाजगी मालकीची आहे. (मिळकत पत्रिकेच्या प्रती संलग्न) त्यामुळे अनधिकृत बांधकाम हे शासनाचे जागेवर नसल्यास प्रश्नाधिन अनधिकृत बांधकामा विरुध्द आवश्यक कार्यवाही सहा.आयुक्त, आर/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत होणे आवश्यक असल्याने त्यांना उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपगनर यांनी कळविले आहे.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी त्यांचे कार्यालयात बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत सहा अभियंता (वि.नि.). बृहन्मुंबई महानगरपालिका, दुय्यम अभियंता (इ व का). आर मध्य विभाग, मंडळ अधिकारी बोरीवली, अवल कारकून बोरीवली, व परिक्षण भूमापक नगर भूमापन अधिकारी, बोरीवली हे उपस्थित होते. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी दि.०१/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालाची प्रत सहा. अभियंता, (वि.नि.). बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.०१/०६/२०२३ रोजी व्हॉट्सअँप द्वारे पाठविण्यात आली होती. त्याच्यांकडून (सी.आर.झेड.) संदर्भातील अहवाल मागविण्यात आला असल्याचे संदर्भ क्र.२ च्या अहवालात नमूद आहे.

प्रकरणी सदर तक्रारीमध्ये नमूद जागेची संयुक्त स्थळपाहणी संबंधित विभागाच्या उपस्थितीत केली असता, तक्रार अर्जात नमूद बांधकाम नगर भूमापन चारकोप, ता. बोरीवली येथील न.भू.क्र.२ (स.नं. ४२) मध्ये येत आहे. मौजे- चारकोप येथील स.क्र. ४२ या मिळकतीवर अंदाजे १६०X५० फुट क्षेत्रांवर लोखंडी पत्र्याची शेड व त्याखाली अंदाजे १५०x२० फुट क्षेत्रावर सिमेंटचे पक्या भितीचे गाळे व रुम आहेत व सदर जागेस पूर्व-पश्चिम, दक्षिण बाजूने पत्र्याचे कंम्पाऊंड आहे व जागेवर उत्तरेकडील बाजूस डेब्रीज़ भरणी करणेत आलेली आहे. २) वरील नमूद जागेवरील कंम्पाऊंडच्या पूर्वेकडील बाजूस एक कंटेनर व पक्या स्वरुपाचे बांधकाम आहे. ३) मौजे चारकोप स.क्र. ४१ड प्लॉट क्र.८०६ या मिळकतीवर म्हाडा लेआऊट मधील रो-हाऊस आहेत व प्लॉट क्र. ८०७ व ८१० हे म्हाडा लेआऊटमधील भूखंड आज रोजी मोकळे आहेत. सदर प्रस्तुत जागेचे स.नं. ४२ असून सदर जागा खाजगी मालकीची असून कैकसरू रतनशा कालापिशी यांचे नावे आहे. सदर मिळकतीचा न.भू.क्र.२ चारकोप गांव असून हक्काचे मूळ धारक सदरी शेती दर्शविलेले आहे.

सदर प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांनी दि.२४/०४/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालाची प्रत संदर्भ क्र.२ च्या अहवालासोबत या कार्यालयास प्राप्त झाली असून सदर अहवालाचे अवलोकन केले असता, सदरचे क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. सदर क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवनापासून ५० मी. च्या बाहेर आहे. तसेच तक्रारीतील नमुद ठिकाणी सन २००५ साली MRSAC नकाशानुसार कांदळवन असल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर ठिकाणी गुगल अर्थनुसार सन २००५ साली अतिक्रमण असल्याचे दिसुन येत नाही. सद्यस्थितीत पाहणी वेळी जागेवर गाळयाचे बांधकाम व भरणी केल्याचे दिसून येत आहे. सदर ठिकाणी पहाणी वेळी कांदळवन असल्याचे दिसून आले नाही. कांदळवन किंवा बफर झोन याची हानी झाल्याचे दिसून येत नाही, असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे सदर प्रकरणो पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ (१) (२) अन्वये कारवाई करता येत नाही. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असून, सदर जागेवरील बांधकाम व भरणीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कार्यवाही करणे उचित होईल. तसेच मौजे चारकोप स.नं. ४९ ड या सर्व्हे क्रमांकावरील भूखंड क्र. ८०७ व ८१० वर भरणी झाल्याचे दिसुन येते. त्याबाबत म्हाडा यांचेकडून आवश्यक ती कार्यवाही होणे उचित होईल.

त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दि.०६/०६/२०२३ रोजीच्या पत्राने सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांना सादर करणेत आलेला आहे. **(प्रत संलग्न)**

तदनंतर सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र.३ अन्वये या कार्यालयास सादर केला आहे. **(प्रत संलग्न)** सदर अहवालानूसार, प्रस्तुत प्रकरणी मा.आयोगाकडे दि.०७/०६/२०२३ रोजी होणाऱ्या सुनावणीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालयात अनधिकृत बांधकामाबाबत सी.आर.झेड. अधिसूचना व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ नुसार कार्यवाही करणेकामी दि.२९/०५/२०२३ रोजी बैठक आयोजित करुन नगर भूमापन अधिकारी, बोरीवली व सहा.आयुक्त, आर/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला. नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना दि.०१/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, प्रकरणी तक्रारीत नमूद बांधकाम हे नगर भूमापन चारकोप, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.२ (स.क्र.४२) मध्ये येत असून सदर मिळकतीचे दक्षिणेकडील बाजुस येत असल्याचे नमूद केले आहे. **(प्रत संलग्न)**

तसेच सहा.आयुक्त, आर/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना दि.०५/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, प्रकरणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप, न.भू.क्र.२ या मिळकतीचा नकाशात दर्शविलेल्या स्थानानुसार सदरचे बांधकाम हे सीआरझेड ने प्रभावित होत नसल्याचे दिसते. तसेच वर नमूद केलेले निरीक्षण हे सी.आर.झेड. च्या मुद्यांपुरते मर्यादित असून त्याच्या मालकीचा संदर्भ न घेता तसेच बांधकामाच्या स्थितीचा पडताळणी न करता केवळ सी.आर.झेड. दृष्टीकोनातून दिलेला आहे, असे नमूद केले आहे. **(प्रत संलग्न)**

सबब, उपरोक्तप्रमाणे आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे.

(सतिश बागल)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.**

**प्रत** :१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

२/- आपलेकडील संदर्भ क्र.५ चे अनुषंगाने सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करणेत येत आहे.

२) सदस्य सचिव,कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई ३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट,फोर्ट, मुंबई.

२/- आपलेकडील दि.१३/०६/२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने अहवाल माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.